महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक एडीआर-२४२५/सी.आर.०६/२०२५/मा.तं. दिनांक: २० जून, २०२५

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवाराच्या खात्याची (Profile) केवायसी (KYC) करणेबाबत**

शासन सेवेतील विविध पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याकरीता संबंधित उमेदवाराला प्रथम आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in ) विहित पध्दतीने एक वेळची नोंदणी (One Time Registration) करावी लागते. तसेच विहित पध्दतीने नोंदणीनंतर संबंधित खात्यामध्ये (Profile) अर्हतेसंदर्भातील विविध प्रकारचा तपशील नोंदवावा लागतो. आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर नोंदणीकृत उमेदवारांच्या ओळख पडताळणीकरीता उमेदवारांच्या खात्यामध्ये आधार क्रमांक नोंदविण्याची पध्दती व सुविधा मार्च २०१७ पासून लागू करण्यात आली आहे.

**२.** आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम २०१६ च्या खंड (ख) च्या उपखंड (दोन) तसेच सुशासनासाठी आधार प्रमाणन (समाज कल्याण, नवसंशोधन, ज्ञान) नियम २०२० च्या नियम ५ अनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियांच्या विविध टप्प्यावर उमेदवाराचे प्रमाणीकरण करण्यासाठी स्वेच्छा तत्वावर आधार अधिप्रमाणीकरणाचा वापर करण्याकरीता कार्यालयीन ज्ञापन, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभाग, फाईल क्रमांक १३(४)/२०२०-ईजी-दोन(खंड पाच), दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ अन्वये भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (UIDAI) मान्यता दिली आहे. तसेच, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ ११२१/प्र.क्र.८६/मलोआ, दिनांक २२ मे, २०२४ अन्वये राज्य शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर उमेदवारांचे प्रमाणीकरण करण्याकरीता ई-केवायसी (e-KYC) सेवांसाठी स्वेच्छा तत्वावर आधार प्रमाणीकरणाचा वापर करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्राधिकृत केले आहे. संचालक, माहिती तंत्रज्ञान व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामध्ये प्रस्तुत प्रकरणी झालेल्या संयुक्त वचननाम्याच्या आधारे भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांच्याकडून त्यांच्या फाईल क्रमांक एचक्यू-१३०८३/८/२०२१-एयुटीएच-II-एचक्यू/सी-४०१९/१०७०९, दिनांक २६ डिसेंबर, २०२४ अन्वये आयोगास आधार प्रमाणीकरणासाठी परवानगी प्राप्त झाली आहे.

**३.** आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियांच्या विविध टप्प्यावर उमेदवाराचे प्रमाणीकरण करण्यासाठी केंद्र शासन / भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त उपरोक्त मान्यता व परवानगीस अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या खात्याची केवायसी करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यपध्दत विहित करण्यात येत आहे :-

**३.१ आधार ऑनलाईन ई-केवायसी :**

**३.१.१** आधार आधारित ऑनलाईन ई-केवायसी करण्याकरीता उमेदवाराला त्यांच्या खात्यामधील ‘आधार ऑनलाईन ई-केवायसी’ हा पर्याय निवडावा लागेल.

**३.१.२** आधार क्रमांक नमूद करुन आधार क्रमांकाशी संलग्न भ्रमणध्वनीवर [Mobile No.] प्राप्त एक वेळचा परवलीचा शब्द [OTP] च्या आधारे संमती देऊन उमेदवाराला आधार प्रमाणीकरण करावे लागेल.

**३.१.३** प्रस्तुत पध्दतीने यशस्वीपणे केवायसी पूर्ण होण्यासाठी उमेदवाराचा आधार क्रमांकाशी संलग्न भ्रमणध्वनी क्रमांक कार्यरत असणे आवश्यक आहे.

**३.२ आधार ऑफलाईन पेपरलेस डिजिटल केवायसी** :-

**३.२.१** उमेदवारांना त्यांच्या खात्यामधील 'आधार ऑफलाईन पेपरलेस डिजिटल केवायसी' हा पर्याय निवडावा लागेल.

**३.२.२** उमेदवाराने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांचे संकेतस्थळ / एम-आधार मोबाईल उपयोजक (ॲप) / नोंदणीकृत क्रमांकावर इनबाऊंड एसएमएसद्वारे / आधार सेवा केंद्रामधून बायोमेट्रिक तपशीलाद्वारे उपलब्ध करुन घेतलेली आधार ऑफलाईन केवायसीची XML/PDF फाईल व सदर फाईल उघडण्यासाठीचा परवलीचा शब्द/पासवर्ड/शेअर फ्रेझ (Share Phrase) अपलोड करावी लागेल.

**३.२.३** उमेदवाराने अपलोड केलेल्या तपशीलच्या आधारे केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. सदर प्रक्रिया ऑफलाईन केली जाणार असल्याने याकरीता वेळ लागू शकतो.

**३.३ आधार ऑफलाईन पेपरआधारित केवायसी :**

**३.३.१** उमेदवाराने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांचे संकेतस्थळ / एम-आधार मोबाईल उपयोजक (ॲप) / नोंदणीकृत क्रमांकावर इनबाऊंड एसएमएसद्वारे / आधार सेवा केंद्रामधून बायोमेट्रिक तपशीलाद्वारे उपलब्ध करुन घेतलेली आधार ऑफलाईन केवायसीच्या XML/PDF फाईलची छापील प्रत घेऊन आयोगाच्या नवी मुंबई येथील कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये व्यक्तिश: उपस्थित राहून केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

**३.३.२** सदर पध्दतीने केवायसीसाठी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहताना उमेदवारांना सोबत खालील मूळ कागदपत्रे व त्यांच्या स्वसाक्षांकित प्रती तपासणीकरीता/ओळखपडताळणीकरीता सोबत आणाव्या लागतील :-

(१) आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, दिव्यांग वैश्विक ओळखपत्र (UDID Card) यापैकी कोणतीही २ मूळ ओळखपत्रे व त्याच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती.

(२) उमेदवाराच्या नावामध्ये बदल असल्यास संबंधित राजपत्राची प्रत किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्याचा दाखला किंवा विवाहामुळे नावात बदल झाला असल्यास विवाह निबंधकांचा दाखला.

**३.३.३** उमेदवाराने सादर केलेल्या तपशीलाच्या आधारे केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. सदर प्रक्रिया ऑफलाईन असल्याने याकरीता वेळ लागू शकतो.

**३.४ नॉन-आधार ऑफलाईन केवायसी :-**

**३.४.१** आधार क्रमांक उपलब्ध नसणाऱ्या अथवा आधार तपशील नोंदवू इच्छित नसणाऱ्या उमेदवारांनी केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता आयोगाच्या नवी मुंबई येथील कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये व्यक्तिश: उपस्थित रहावे लागेल.

**३.४.२** सदर पध्दतीच्या केवायसीसाठी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहताना उमेदवारांना सोबत खालील मूळ कागदपत्रे व त्यांच्या स्वसाक्षांकित प्रती तपासणीकरीता/ओळखपडताळणीकरीता सोबत आणाव्या लागतील:-

(१) आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, दिव्यांग वैश्विक ओळखपत्र (UDID Card) यापैकी कोणतीही २ मूळ ओळखपत्रे व त्याच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती.

(२) उमेदवाराच्या नावामध्ये बदल असल्यास संबंधित राजपत्राची प्रत किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्याचा दाखला किंवा विवाहामुळे नावात बदल झाला असल्यास विवाह निबंधकांचा दाखला.

**३.४.३** उपस्थित उमेदवारांना त्यांच्या दोन्ही डोळ्यांची बुबुळे, चेहरा व दोन्ही हाताच्या सर्व बोटांचे ठसे यांचे नमुने आयोगाच्या कार्यालयाकडील यंत्रणेद्वारे नोंदवावे लागतील.

**४.** आधार क्रमांकाच्या आधारे पडताळणी करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत आधार प्रमाणीकरणाच्या वेळी प्राप्त होणाऱ्या VID (Virtual ID) / UID (Unique ID) Token च्या आधारे परीक्षा, मुलाखत, शारीरिक चाचणी अथवा

नियुक्तीपूर्व ओळख पडताळणी करण्यात येईल. उमेदवाराचा आधार क्रमांक अथवा अनुज्ञेय नसलेली अन्य कोणतीही माहिती आयोगाकडे संग्रहित केली जाणार नाही. केवळ संदर्भासाठी VID / UID Token व आधार क्रमांकाचे शेवटचे चार अंक संग्रहित करण्यात येईल.

**५.** आधार क्रमांकाच्या आधारे ओळख पडताळणी न करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या ओळख पडताळणीच्या आधारे उमेदवारास ऑफलाईन केवायसी क्रमांक प्राप्त होईल व त्याच्या आधारे केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. सदर ऑफलाईन केवायसीच्या आधारे प्राप्त विदा आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे जतन करण्यात येईल व त्याच्या आधारे भरती प्रक्रियेच्या परीक्षा, मुलाखत, शारीरिक चाचणी अथवा नियुक्तीपूर्व ओळख पडताळणी करण्यात येईल.

**६.** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये प्रथम नोंदणी करताना उमेदवारास भ्रमणध्वनी तसेच ईमेल उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि, आधार आधारित ओळख पडताळणीच्या प्रस्तुत व्यवस्थेमुळे उमेदवाराला आधार क्रमांकाशी संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देणे अनिवार्य ठरविण्यात येत आहे. सबब आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये नोंदणीसाठी दिलेला भ्रमणध्वनी क्रमांक व आधार नोंदणीसाठी उपलब्ध करुन दिलेला भ्रमणध्वनी एकच असल्याची उमेदवारांनी स्वत: खात्री करावी. यासंदर्भातील कोणत्याही तक्रारीची / गैरसोयीची आयोगाच्या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही.

**७.** उमेदवारांच्या ओळखपडताळणीसंदर्भातील प्रस्तुत कार्यपध्दतीचा अवलंब **दिनांक १५ जुलै २०२५** पासून करण्यात येईल. **दिनांक १५ जुलै २०२५** पासून कोणत्याही पदभरतीकरीता आयोगाकडून प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता केवायसीची प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय अर्ज सादर होऊ शकणार नाही.

**८.** ओळख पडताळणीसंदर्भातील केवायसी बाबतची प्रस्तुत कार्यपध्दती एक वेळची प्रक्रिया (One time process) आहे. सदर कार्यपध्दतीनुसार पडताळणीची प्रक्रिया उमेदवार स्वेच्छेनुसार केव्हाही पूर्ण करु शकत असला तरी उमेदवारांनी शक्य तितक्या लवकर केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी.

**९.** उमेदवाराच्या ओळख पडताळणीसंदर्भातील प्रस्तुत केवायसी प्रक्रियेनंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये उमेदवाराचे केवळ एकच खाते (Profile) जतन करण्यात येईल. अन्य खाती निष्क्रीय समजण्यात येतील.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग